# बेधुंद मिजास

पहाटेची मनमुग्ध नभावरील रातीचा गडद अंधारावर, उबेची सूर्यकिरणं, त्यावर स्नान करण्याची लयाशीत होते असे निसर्गाचे प्रलोभनीय दृश्य, अनिकेत आपल्या प्रशस्त गॅलरीत ते निसर्गाचे देखणे पाहण्यात गुंग होता. क्षणभरात आसावरीचा चेहरा डोळ्यासमोर आला दिर्घ श्वासाचा उसासा घेत मनात अनेक प्रश्नांची, उत्तरे कशी शोधावीत असे प्रश्नामागून प्रश्न व विचारांची गर्दी, नियतीने पुढे काय वाढून ठेवले आहे ते कळत नव्हते.

आज नेमके १४ फेब्रुवारी एक वर्षात अनिकेत व आसावरी त्यांची गाडी ही ब्रेकपर्यंत जाऊन पोहचली होती आता कोणत्या तोंडाने घरी जायचे हा मोठा यक्ष प्रश्न होता. अनिकेत समोर विचारांच्या गडगडाट मध्ये डोअरबेलच्या आवाज येत होता. क्षणात अनिकेतची तंद्री भंगली मग एवढ्या सकाळी सकाळी कोण कडमडलं असणार असा विचार करत करत दरवाजा उघडला तर आसावरीचे बाबा पोर्चमध्ये आले.

अनिकेत : "या नाना."

नाना : काय "अनिकेत राव बरे आहे ना."

अनिकेत : "हो नाना! बरे आहे ना ? पण हे सांगताना अनिकेतच्या आवाजात विशेष धार दिसत नव्हती

नाना : " अनिकेत स्पष्ट विचारतो तुमच्यात आणि आसावरीत काही अनबन आहे का ? कारण काल तुमचा लग्नाचा वाढदिवस; तो ही तुम्ही तुमच्या प्रोजेक्टच्या वेगवेगळ्या साईटवर साजरा केलात ? तुमचा लग्नाचा पहिला वाढदिवस अश्या पद्धतीने साजरा करतात, खरेच खूप कुतूहल वाटते, तुमच्या पिढीचे रे ?

अनिकेत : " नाना तुम्ही सुद्धा मला या प्रकरणात जबाबदार धरता आहात का ?

०९

नाना : "हो तुम्ही दोघेही तेवढेच जबाबदार आहेत, या गोष्टींना मला हसावे की रडावे हेच कळत नाही तसे पाहिले ना अनिकेत तुझे वडील बाबा व मी जेव्हा तुम्ही, दोघे, बंगलोर "लिव्ह इन रिलेशन" मध्ये होतात. तेव्हापासून भेटायचो, असेच त्या तुमच्या कॅम्पसमध्ये आमची चुकून सकाळी सकाळी मॉर्निंग वॉकसाठी भेटी व्हायच्या, योगायोगाने आम्हास कळाले, की आपले मुले खूप सज्ञान, तसे तुम्हाला तुमचे निर्णय घेण्यास स्वातंत्र्य दिले, की? तुम्ही ते खेचून घेतले होते. त्याला कारण म्हणजे तुमचे ते वीस ते पंचवीस लाखाचे पॅकेज अथवा, पॅकेजच्या डिलने आम्हांला हरविले ना रे तुम्ही?

अनिकेत : "नाना आसावरीस मानतो आहे मी, खरे म्हटले तर वाद त्या थरास जाणार नाही, असे वाटले नव्हतेच. पण शब्दामागे शब्द वाढत जातो व मी पणाची भावना मनात वाढत राहते, मग इगो व बरोबरीची भावना मनात प्रबळ वाढून येते. त्यामुळे कोण माघार घेणार? प्रथम हा मुद्दा निकाली निघत नाही.

नाना : "एक दिर्घ उसासा घेत नाना म्हणाले, कसल्या गप्पा रे तुम्ही मारतात, लग्न म्हणजे काय भातुकलीचा खेळ वाटला का तुम्हाला? एकटे वर्षभर लिव इन मध्ये राहतात, तुम्ही तुमचे निर्णय घेतात, व्यक्ती स्वातंत्र्य दिले दोघांच्या घरातून सर्व काही मूक संमती होती, तुम्ही जे ठरवले ते पुर्व दिशा, मग हा कसला माज आहे ना? ना कसले बंधन? ना काही देणे घेणे ज्या आव्हान राहतो त्या सर्व स्नेहीजनांचा, ना त्यांच्या विचारांचा सन्मानाचा आदर, ना कुठलेच कसलेच बंधन नाही, लिव का ती रिलेशनशिप? तुम्हास कुटुंब व्यवस्था म्हणजे काय आहे ते कळते का? आणि त्रस्त नजरेचा कटाक्ष टाकून नाना निघून गेलेत.

कधी नव्हे नानांच्या त्या शाब्दिक बाणांनी अनिकेत खूप घायाळ झाला होता. अगदीच दोन वर्षांत मोजून तिनदा नानांची ~~नानांची~~ गाठभेट झाली होती.

पण इतके ते कठोर कधीही बोलले नव्हते. अनिकेत साठी हे खुप शॉकिंग होते.

*. दोन महिन्यानंतर.........

आसावरीचा पण आता कंपनीचा दिलेला प्रोजेक्ट संपला होता. थोडेसे स्वतःला स्वतामध्ये बघण्याचा वेळ मिळालेला होता. ~~आसावरि~~ आसावरीस पण वाटत होते, मनापासून की अनिकेत इतका काही बुरसटलेल्या विचारांचा नव्हता, पण माझ्या शब्द बाणांनी तो घायाळ झालेला होता हि पूर्ण कल्पना आसावरी होती. स्वध्यात मोबाईलची रिंग वाजते.... देशपांडेचा कॉल होता.

वकिल : " नमस्कार आसावरी

आसावरी : " बोला ताई! मी तुम्हाला ताईच म्हणणार, चालेल ना ?

वकिल : हो हो आसावरी तुला हवे ते म्हण, तु मला ताई मानलेच आहे, त्यामुळेच तुला फोन करते आहे. हे बघ मला अनिकेतच्या वकिलां फोन आलेला, आमची एक मिटींग झाली आहे. पण वरकरणी दोघांच्या बाजू रेकल्यात, पण इतके काय मोठे, कारण वाटत नाही. असे त्यांच्या वकिलाचे मत आहे. पण मी त्यास ठासून सांगितले की, माझ्या अशिलास हे मान्य नाही आहे. मग आपण ~~कोर्ट~~ कोर्टातच भेटू जी तारिख असेल तेव्हा समोर बोलू यात हे सर्व तुला चालेला ना ? तुला आसावरी ?

आसावरी – "ताई मी जस्ट, आजच माझ्या प्रोजेक्ट मधून फ्रि झाले, जरा थोडा वेळ दे ना, मला स्वतः बोलून फोन कट होता.

(continued)

Page No.: ४

आसावरी असेच फोन खेळता खेळता रेडिओ केंद्र १०३.४ ट्यून करते, त्यावर प्रार्थना चालू असते.

"तु बुद्धी दे तु तेज दे,
नवचेतना विश्वास दे
जे सत्य सुंदर सर्वथा
आजन्म त्याचा ध्यास दे."

आज आसावरी कसेच मळे मळतेच वाटत होते, अगोदर नानांच्यापासून थोडी दूर गेलेली, अनिकेत लव्हमॅरेज करून, त्यात नविन हे वर्षभरातील महास्फोटाचे वादळ उठलेले, त्यामुळे नानांनी असहाय्य होऊन आसावरीशी बोलणे सोडून दिले होते. ह्या सर्व घटना आसावरीच्या डोळ्यासमोर आल्यात व ज्या सुखासाठी आयुष्य भर धावत राहिलेत ? कुठेतरी सर्व स्थिर स्थावर होत असतांना अचानक आईने नानांची साथ सोडली ह्या सर्व घटना ? व नानांचा सोशिक चेहरा, आसावरीच्या मनाच्या स्मृती पटलावरून हलत नव्हते, ऑफिसच्या प्रोजेक्टच्या लिडरचे बोचक बोलणे व त्यांची आसावरीच्या बघण्याची "दृष्टी" आसावरीस खटकत होती.

त्या क्षणी ती खरे तर अनिकेतला खूप खूप मिस करत होती. ज्या दिवशी त्यांचे भांडण झाले त्या दिवशीच्या तिच्या वाकबाणांनी अनिकेतला खूप घायाळ केले होते. पण काहिही असो तिला खूप जाणीव होत होती. की ह्या संसारभवात "पैसा कपडे व कॉरपोरेट माहोल! हेच काही म्हणजे आपले आयुष्य नाही? दुरकरुणी हे जरी छान व मोहमयी दिसते, पण त्यात आपला सोबती नसेल तर मग काय त्या जगण्यात अर्थ आहे ना ?

"देव" म्हणा भगवंत म्हणा किती काळजीपुर्वक देवाने ह्या जै जोड्या बनवल्या आहेत. पण आपण माती खातो व खोटा अहंभाव मनी ठेवुन वागणे व गृहीत धरणे यामुळे छोटे भांडण मोठे मोठे होत जाते, असे अनेक प्रसंग आसावरीपुढे तरळून जातात.

आजकाल कोर्ट व दोघेही बाजूचे वकिल पक्षकारांनापण कळत नकळत अर्ज मागे घ्या सांगत असतात उगीच रागाच्या भरात निर्णय घेऊन स्वतला दुःखाच्या खाईत लोटू नका

असे संतान असताना ही खूप सकारात्मक भाव आहे सरकारी अधिकाऱ्यांची

* उत्तरार्ध ......

अनिकेत - आज घरीच होता शुक्रवार संध्याकाळचे पाच वाजलेले शनिवार व रविवार सुट्टीच मध्यान डोअरबेल वाजते.

अनिकेत : या नाना।

नाना :- तुला इथे मी आलेले चालेल ना ?

अनिकेत : "नाना" कधी पासून परवानगीची गरज आहे.

नाना :- तुमचे काय तुम्ही खरे नाही ? तुम्ही कधीही काही म्हणून टाकलेत. "थोरली पोर म्हणते की तुम्ही ध्यान मग घेऊ नका ? मग काय बोलायचे राहिले आता" हे सर्व ऐकून अनिकेत खूप खजिल होतो. नानांच्या नजरेस नजर मिळवण्याची हिंमत त्यात नसते. "हे सर्व मी आसावरीस बोलवले आहे तुम्ही दोघे बोला मग मला सांगा काय ते."

अनिकेत — "नाना नाना म्हणत, त्यांच्या पायाला कवटाळतो नाना त्यास उठवून आलिंगण देतात, मुके डोळ्यांच्या भावाने अनिकेतचे डोळे भरून आलेले.

नाना : श्यामने तुझा हात माझ्याकडे सोपवला त्या दिवसापासून मुलगाच मानले रे तुला ? पुढे पुढे तुम्ही दोघही एकाच फिल्ड मध्ये इंजिनिअर झालात तुमचे दोघांचे कॅम्पस मुलाखतीचे यश बघून "मला स्वर्ग दोन बोट राहिला" परंत डोअर बेल वाजते, व अनिकेत धावत जाऊन दरवाजा उघडतो व आसावरी अनिकेत एकमेकांच्या मिठीत पडतात. व एकमेकांना बघून मूक स्तंभतीत अश्रूंची धार पडते न बोलता संवाद घडू शकतात.

आसावरी :- " अनिकेत चुकले मी मला माफ कर तुझ्या अबोल स्वभावाचा फायदा घेतला, इथून पुढे अशा हा प्रकार कधीही होणार नाही. मला माहित आहे आपले



व्हिडिओ पहा

सामशिक्षण सम पदभार व तोडीस तोड पॅकेजमुळे सर्वांकास शह प्रतीशह देत होतो. पण ही चुक नानांनी लक्षात आणून दिली...

अनिकेत – खरे आहे आसावरी! आपला दर्जा व ऑफिस मध्ये तुला मिळालेले झुकते माप, कुठेतरी टॉप मॅनेजमेंटने सर्वांकास लावलेली स्पर्धा असे मला आता कळाले. कळत नकळत त्यांच्या राजकारणामध्ये आपली शिकार झाली आता ही चुक परत नाही करायची......

नाना : "मुलांना" या हॉलमध्ये बसू द्या. मी मस्त गरमागरम कॉफी बनवली आहे. नानांच्या पाठोपाठ ते दोघेही येतात व नानांच्या पाशी बसतात. मुलांनो मी आज आहे, उद्या नसेन? तुम्ही आता या संसाराच्या चक्रात घुसा हे केल्याशिवाय तुम्हाला संसार काय आहे? हे कळणार नाही. या जगात "कोणीही कोणाचे नसते. जीवन आहे तर मरण पण आहे. संपत्ती, ऐश्वर्य हे चंचल आहे. आपल्या आयुष्याची उपलब्धी ही काय आहे हे कळले पाहिजे माणसास?

समर्थांनी दास बोधात म्हटले आहे. प्रत्येक नरदेहाकडून अनेक गोष्टी साध्य होतात. श्रवण, मनन, विद्या अभ्यास, कर्म, उपासना ज्ञान, आणि परमात्मा प्राप्ती हे सारे देहानेच मिळते. म्हणून "देहेविण निरर्थक सकल काही" ईश्वराचे वास्तव्य सर्वत्र आहे. आत्माच्या रूपाने तो देहात भरून आहे. म्हणून कोणाला दुखवू नये श्री समर्थ म्हणतात "नारायण असे विश्व! त्याची पूजा करीत जावी। या कारणे तोषवावी! कोणी तरी काया" ईश्वराच्या सर्व व्याप्तीची आठवण ठेवून "देहाकडे प्रपंच करावा नेटका आणि पहावे परमार्थ विवेका" जोपर्यंत देह धडधाकट आहे तोपर्यंत क्षणही वाया जाऊ देऊ नये. सतत श्रवण-मनन केल्याने आपला संसार पवित्र होतो. "फुलासंगे मातीस वास लागे" ह्या नियमाने सकाचा गुण स्वतांचा उध्दार करतो. (दासबोध संकलीत आहे)

समाप्त × —— समाप्त.

लेखक नितिन शिंपी नाशिक